Shodhankur Research Journal

Online Monthly September 2024 VOL -01 ISSUE-I

06

# लोक साहित्यातून लोककलेचे संवर्धन

**प्रा. दीपक संतोष पवार**

डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

---

प्रस्तावना :-

लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीचा आरसा किंवा आविष्कार आहे असे म्हटले जाते. मराठीत `लोकसाहित्य` हा शब्द Folklore या इंग्रजी शब्दासाठी वापरला जातो. लोकसाहित्याची व्याख्या करणे कठीण आहे. हा सामासिक शब्द `लोक` व `साहित्य` या दोन पदांच्या संयोगाने बनलेला असून त्यातील लोक हे पद Folk साठी आणि `साहित्य` हे पद lore साठी वापरले जाते. लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा म्हणजेच लोकसाहित्य असते.

`लोकसाहित्य` हा शब्द लवचिक असून त्यात लोकसमूहाच्या अलिखित किंवा मौखिक स्वरुपाच्या भाषाविष्कारांचा समावेश होतो असे जॉर्ज एम. फॉस्टर यांनी म्हटले आहे. दैवतकथा, कथागीते, लोकनाट्य, तालगीते, म्हणी, लोकगीते तसेच लोकविश्वास व लोकभ्रम यांचाही लोकसाहित्यात अंतर्भाव केला आहे. याशिवाय पारंपरिक खेळ, उत्सव यांचाही यात समावेश होतो.

लोकसाहित्याचाच लोककला एक भाग असतो. यात निरनिराळया विधींच्या वेळी, उत्सवाच्या वेळी म्हटली जाणारी लोकगीत आणि लोकनृत्य यांचे अस्तित्व परस्परावलंबी असते. तसेच लोककला प्रकार आणि व्यक्तिनिर्मित कला प्रकार यांचा संबंधही घनिष्ठ असतो. कलावंत लोककला प्रकारातून काही विशेष घेतात आणि कलाकृतीची निर्मिती करतात. त्यात लोकसंस्कृतीच्या घडणीत वासुदेव, गोंधळी, भुत्या, वाघ्यामुरळी, भराडी इ. लोकसांस्कृतिक संस्थांचा महत्त्वाचा वाटा आहे. समाजात पारंपरिक रचनेनुसार धर्म-भावना जागृत ठेवणे, लोकदेवता संबंधीची श्रध्दा अविचल राखणे. सामाजिक नीतिनियमांचे महत्त्व पटविण्याचे काम ही संस्कृती करते. खालील लोककला ही संस्कृती आपल्याला जपताना दिसते -

1) गोंधळी :-

गोंधळी ही समाजात केवळ प्रतिष्ठा पावलेली संस्था आहे असे नव्हे तर लोकांच्या धार्मिक जीवनाची एक अविभाज्य अंग बनलेली आहे. घरी एखादे मंगल कार्य झाल्यानंतर गोंधळ हा देवीच्या उपासनेचा नाट्यात्मक स्वरूपाचा विधी असतो. अंगरख, गळयात कवड्यांची माळ, डोक्यावर कंगणीसर पगडी अशा पोशाखातील गोंधळी हा आपल्या साथीदारांसह संबळ, तुणतुण्याच्या साथीने देवीच्या पूजेनंतर कथागीते गाऊन जागर करतो. गोंधळयांची अनेक कथागीते महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीच्या `एक होता राजा` या प्रकाशनात संग्रहित करण्यात आली आहेत.

2) वासुदेव :-

वासुदेव हा महाराष्ट्रातील गावांमध्ये सकाळच्या वेळी घरोघरी हिंडून पांडुरंगावरील अभंग-गवळणी गानदान मागणारा लोककलाकार आहे. हा तीर्थक्षेत्रात स्नान करायला आलेल्या मंडळींना नाना तीर्थक्षेत्रांची आणि तिथल्या देवतांची नावे सांगतो. त्या अर्थाने वासुदेव तीर्थाचा चालताबोलता कोशच आहे. त्याला पैसे दिले की, तो सगळया दैवतांच्या नावाने पावती देतो व मग अलगूज वाजवतो. वासुदेवाच्या साहाय्याने शिवाजींनी मावळयांच्या घरी निरोप पाठविले आहेत. तसेच हेरगिरीसाठी उपयोग करून शत्रूंच्या गोटातल्या बातम्याही मिळविल्या आहेत.

3) भुत्या आणि पोतराज :-

गोंधळयाप्रमाणेच भुत्या आणि पोतराज हे अनुक्रमे जगदंबेचे आणि लक्ष्मी आईचे भगत असात ते विविध उत्सव प्रसंगी आपापल्या देवतांची कथागीते गातात. ही गाणी सामूहिकपणे म्हटलेली नसतात. त्यांना साथीदार असलाच तर तो वाद्य वाजवणारा असतो. तोही कथा गीते स्वत:च साभिनय म्हणतो. बडन तसेच कार्‌हन झाल्यानंतर जागरण घालतांना म्हटली जाणारी पोतराजांची कथागीते आजची भाविकांना भुरळ घालतात.

4) वाघ्यामुरळी :-

हे खंडोबाचे भगत देखील कथागीते गातात. त्यांच्या कथागीतांचा घाट आणि अंतर्बाह्य ढंग शाहिरी कवितेचा असतो. त्यातील प्रणयाचे रंगढंग लावणीच्या सुरातील असतात.

5) पोवाडा :-

भारतात वीर पुरूषांची गाथा गाण्याची परंपरा फार प्राचीन आहे. नरप्रधान गाथा हा श्रेष्ठ पुरूषांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसंगावर तसेच त्यांच्या दानशूरतेवर आधारलेली कथागीते असतात. त्यालाच पोवाडा म्हणता येईल. यात शौर्यगाथा जशा असतात. तशाच विशुध्द प्रेमकथाही असतात. पराक्रमगाथा किंवा वीरपुरूषांच्या शौर्यासंबंधीच्या कथात्मक गीतांनाच पोवाडा म्हणतात. त्यांची परंपरा महाराष्ट्राप्रमाणेच राजस्थान, पंजाब, छत्तीसगढ, कच्छ, काश्मीर इ. प्रांतातही आढळते.

6) लावणी :-

शेतामध्ये लावणी करताना जी गीते म्हटली जातात त्यात लावणीचे मूळ असल्याचे दुर्गा भागवत यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते लावणी हा मूळचा शेतात कृषिकर्म (लावणी) करताना म्हणण्याच्या लोकगीताचा प्रकार, कालांतराने विधियुक्त व मागाहून विधीशी फारकत झाल्याने प्रश्नोत्तरांच्या व नंतर शाहिरी शृंगाराच्या गीतात परिणन पावला. प्रश्नोत्तरे लावणी या प्रकारातच येतात. मूळ लावण्या शेतात लावणीच्या वेळी म्हटल्या जात असत याचा पुरावा लावण्यातच मिळतो.

7) भजन / कीर्तन :-

कीर्तन, लळीत, भजन इ. नी लोकप्रकटन संस्थेद्वारा संतसाहित्याचे नियमन केले किंवा संतसाहित्याचे स्वरुप निश्चित केले. संतांनी जी आख्यानकाव्ये लिहिली ती देखील कीर्तनामध्ये भक्तीसंबंधीच्या एखाद्या तत्त्वांचे स्पष्टीकरण करण्यासाठी, दृष्टांत कथा सांगण्यासाठी तिचे स्वरुप कीर्तनोपयोगी आख्यानांचे आहे. कीर्तन, त्यातील पूर्वरंग-उत्तररंग इत्यादी समजून घेतल्याशिवाय कीर्तन समजू शकत नाही.

लोककलांचा आणि लोकवाङ्मयाचा स्वत:चा प्राचीन काळापासून परंपरेने चालत आलेला एक ढंग असतो. ज्यांची तो निर्मिती असते. त्यांच्या जीवनाचे विशेष त्यातून दिसतात. ते निराळेपण त्यांचे स्वत:चे असते. त्याचबरोबर समाजातील व्यक्तिमने जी निर्मिती करतात त्या कलाकृतीतून काही गोष्टी लोकवाङ्मयात अभावितपणे स्वीकारल्याही जातात. त्याच्या उलट लोकांच्यामध्ये प्रचलित असलेल्या कथा प्रकारांचा कलावंतांवर परिणाम होत असतो. याचाच अर्थ असा होतो की, लोककलांचे प्रभाव कलावंताच्या निर्मितीवर पडणे आणि कलावंतांनी निर्माण केलेल्या कलाकृतींतील वैशिष्ट्ये लोककलांमध्ये स्विकारली जाणे या दोन्हींही क्रिया एकाचवेळी घडत असतात. लोककलांमुळे अभिजात कलांचे पुनरूज्जीवन होते. संपूर्णपणे नवीन निर्मिती असते. लोककलांची निर्मिती हा केवळ अनुकरणाचा प्रकार नसून स्वयंभू कलाप्रकार आहे.

गोंधळी, पोतराज, वासुदेव, भराडी अशा लोकसांस्कृतिक संस्थांचे सदस्य केवळ पारंपरिक लोककथागीते गात नाहीत तर त्यांची निर्मितीही करतात. हीच गीते परंपरेने रूढ होतात. व्यक्तिनिर्मित आणि लोकमान्य अशा या कथांनाच लौकिक कथागीते सुध्दा म्हणतात. त्याचप्रमाणे शाहिरी कविता मग ती लावणी असो की पोवाडा. एका प्रतिभावंताच्या मनाची निर्मिती असून त्याचे रचनाकौशल्य त्यात प्रकट झालेले असते.

म्हणूनच शाहिरी कविता लोकगीत नसून लोककलाच असते आणि म्हणूनच लावणी हा प्रकार गोंधळी-शाहिरांनी रूढ केला. या लोककलांनी आपापल्या प्रातांची वेगळी ओळख जपून ठेवली आहे.

8) या लोककलांमध्ये महाराष्ट्रातील लोकनृत्य म्हणजे लेझीम, डोंबाऱ्याचे खेळ, मानवीवाद्य हे सुध्दा कलाप्रकार येतात. मानवीवाद्य ही लोककला विदर्भात विशेषत: नागपूर परिसरात प्रसिध्द आहे. सन 1972-74 पर्यंत ही कला पहावयास मिळत होती. ती आता लोप पावत आहे. मानवी शरीरावर जंगलातल्या वाघासारखी रंगरंगोटी करून डोक्यात केसाळ टोप घालून व वाघासारखे कान व शेपटी लावून वाघाच्या तालावर मानवी वाघ नाचत असे. या मानवी वाघाची रंगरंगोटी करणे ही सुध्दा एक कला आहे. या रंगकामात, पट्टेदार वाघ, दोऱ्यावाघ, झेंडू वाघ, बिट्टु वाघ आदि समाविष्ट आहेत. यामध्ये शरीरावर रंग लावला जात असल्यामुळे शरीराची आग होत असते. शरीराची चामडी रंगामुळे ताणली जाते. नंतर लावलेला रंग 8 - 10 दिवस निघत नाही. तो घासून काढावा लागतो. त्यानेही शरीराची आग होते. या सर्व त्रासामुळे आधुनिक पिढी हा वारसा चालवायला तयार नाही. कारण गोंडी तालाऐवजी ते डी. जे. च पसंत करतात.

9) तमाशा :-

हा गायन, वादन, नृत्य आणि विनोद यांनी युक्त असलेला लोकनाट्याचा आविष्कार आहे. तमाशात काम करणारी पुरूषपात्र नेहमीच्याच वेशात असतात. तर स्त्री पात्रांची वेशभूषा शक्य तितकी आकर्षक व उद्दिपक असते. तमाशातले गायक, वादक, सुरत्या (सूर देऊन साथ करणारा) व नर्तकी सदैव मंचावरच असतात. या मंचाला तमाशाच्या भाषेत बोर्ड म्हटले जाते. या खेळामध्ये गण-गौळण, बतावणी, फार्स, रंगबाजी आणि वग असे पाच प्रकारचे नाट्य असते.

१) लोककलेच्या संवर्धनासाठी उपाययोजना :-

१) शालेय, महाविद्यालयीन स्तरावर जे स्नेहसंमेलन होतात त्यात ह्या कला सादर करणे.

२) ह्या लोककलांना प्रोत्साहन मिळावे. नवी पिढीला माहिती व्हावी म्हणून व्याख्यान, सभा, चर्चासत्र आयोजित करावी.

३) तमाशातील कलाकार, वासुदेव यासारखे जे कलावंत लोककला सादर करतात त्यांना समाजात मानाचे स्थान मिळावे.

४) लोककला कलावंतांना तमाशातील कलावंतासोबत इतर कलाकारांना सुध्दा सरकारी अनुदान मिळावे. जेणेकरुन त्यांचा चांगला उदरनिर्वाह होऊन कलेचे संवर्धन होईल.

५) मराठी लोककलेचे जतन व प्रसार करणे ही प्रत्येकाने नैतिक जबाबदारी समजून आपले मत, चित्रफीती, प्रसार माध्यमांच्या द्वारे प्रसारीत करावीत. उदा. व्हॉट्स अॅप, फेसबुक इ.

६) या लोककलांना चांगले व्यासपीठ मिळवून देणे. उदा. तमाशा, लावणी.

७) या लोककला फक्त मनोरंजनासाठी नसून यातून जनजागृतीसुध्दा होऊ शकते हे समाजाला पटवून देणे, पथनाट्याच्या द्वारे.

या कलाद्वारे समाजातील सांस्कृतिक मनोरंजनाचा विषय घेऊन जनजागृती घडविणे.

निष्कर्ष :-

1) लोकपरंपरेतील कल्पनाबंधनातून काही अभिजात वाङ्मयकृती जन्म घेतात.
2) लोकजीवनातील पारंपरिकता ही लोकसाहित्याचा विशेष आहे.
3) लोककला ह्या माणसाचा आविष्कार असते.
4) लोकसाहित्य हे कला, वाङ्मय यांचे स्रोत असते.

Shodhankur Research Journal

Online Monthly September 2024 VOL -01 ISSUE-I

5) लोककलेद्वारे समाजमानस, त्याच्या प्रतिक्रिया जशा व्यक्त होतात, त्याचप्रमाणे समाजाला वळण देण्याचे कार्यही लोकसाहित्यातून होते.
6) लोकसाहित्य हे व्यक्तीचे जीवन आणि समृध्द करण्याला मदत करते.
7) लोकसाहित्यातील लोककलांमुळे मनोरंजन देखील होते.
8) समाजामध्ये परंपरेने चालत आलेल्या सामाजिक संस्थांना लोकसाहित्याद्वारे समर्थन लाभते.
9) एखाद्या घटनेविषयी, व्यक्तीविषयी, कृतीविषयी अनुकूल / प्रतिकूल प्रतिक्रिया त्यातून प्रकट होतात. या लोककला लोप पावत चालल्या आहेत.

**संदर्भ सूची :-**

1) दुर्गाबाई भागवत - लोकसाहित्याची रूपरेखा
2) प्रभाकर मांडे - लोकसाहित्याचे अंत:प्रवाह
3) सरोजिनी बाबर - मराठी लोककथा